प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# सायबर सुरक्षा अभियानातील विद्यार्थ्यांचा सन्मान



सायबर सुरक्षा अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना मान्यवर.

**आळेफाटा : पुढारी वृत्तसेवा**

क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागात राबविण्यात येत असलेल्या सायबर जागरूकता अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानात आळे महाविद्यालयाचे बीएससी संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी परिसरातील शाळा, महाविद्यालये, बसस्थानके येथे जात तसेच महिला बचत गटांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करीत आहेत. अभियानात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ३० विद्यार्थ्यांचा क्विक हिल फाउंडेशन प्रमुख अनुपमा काटकर, संचालक अजय शिर्के, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रदीप गुंजाळ, संचालक जीवन शिंदे, रमेश कु-हाडे, प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव, विभाग प्रमुख नुतन जोशी यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्राचार्य जाधव यांनी स्वागत केले. क्विक हिल फाउंडेशन सोबत राबवित असलेला उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. क्विक हिल फाउंडेशनच्या अनुपमा काटकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी, महाविद्यालय व संस्था करीत असलेल्या कामाचे कौतुक केले.

संस्थेचे अध्यक्ष अजय कु-हाडे उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, संचालक किशोर कु-हाडे, भाउशेठ कु-हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबुशेठ कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, दिनेश सहाणे, कैलास शेळके, देविदास पाडेकर, सम्राट कु-हाडे यांनी उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आयोजन विभाग प्रमुख नूतन जोशी, सर्जेराव थोरात आदींनी केले.

My Gramin Edition
Jan 01, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com